PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 9, ISSUE 2

# पंडित नेहरूं आणि सरदार पटेल

**अरुण वाहूळ**

**सहायक प्राध्यापक, इतिहास विभाग,**

**विवेकानंद महाविदयालय छत्रपती संभाजीनगर.**

**महाराष्ट्र भारत**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये पंडित जवाहलाल नेहरु आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी गांधीजीच्या मार्गदर्शनाखाली बरोबरीने काम केले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाला पुढे घेऊन जाण्याच्या कामात ही दोघांची भूमिका निर्णायक होती. पण भारतीय इतिहास लेखनामध्ये या दोघांच्या भूमिका बाबत घेतली जाणारी भूमिका भिन्न प्रकारची आढळते. भारतामध्ये दोन प्रकारची इतिहास पाहण्यात मिळतो. एक तथ्यअंशाचा अभाव असलेला आणि दुसरा तथ्यावर आधारलेला. समाजातील बहुतेक लोक पहिल्या इतिहासाच्या प्रकाराला महत्व देऊन त्या इतिहासाला प्रमाण मानतात आणि त्यानुसार आपली मते बनवतात. २०१४ पासून याच इतिहासाचा प्रचार-प्रसार करुन नेहरु आणि पटेलाविषयी गैरसमज पसरविण्याचे काम सुरु झाले आहे. नेहरु हे किती वाईट आणि पटेल किती चांगले. काँग्रेसने पटेलावर किती अन्याय केला, नेहरुंचे स्वातंत्र्य चळवळीमध्ये काही योगदान नसताना पटेलाना डावलून त्यांना पंतप्रधान पद दिले, त्यामुळे देशात कश्मीर समस्या, ३७० कलम या सारख्या समस्या निर्माण झाल्या. पटेल पंतप्रधान असते तर ह्या समस्या निर्माण झाल्या नसत्या, असा अप्रचार संपूर्ण देशात सुरु झाला. सरदार पटेलाचा पुतळा गुजरातध्ये मोठ्या करण्याच्या मोहिमेमध्ये नेहरुची प्रतिमा मलिन करुन त्यांची उंची कमी करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

सध्याच्या सरकारकडून दावा केला जातो कि पं. नेहरु ऐवजी पटेल पंतप्रधान झाले असते तर देशात खुप काही चांगले झाले असते. पण ते हे विसरतात की जर पटेल पंतप्रधान झाले असते तर डिसेंबर १९५० सालीच देशाला दुसरे पंतप्रधान निवडावे लागले असते. कारण १५ डिसेंबर १९५० रोजी पटेलाचे निधन झाले. गांधीनी अत्यंत विचारपूर्वक निर्णय घेऊन पटेलाचा शारीरिक मर्यादा लक्षात घेऊन नेहरुना पंतप्रधान केले होते. पण सध्या देशात वास्तविकता समजून न घेता खोट्या प्रचारावर विश्वास ठेवून लोक चर्चा करत आहेत. वास्तविक इतिहास समजून घेण्यासाठी ऐतिहासिक संदर्भात अभ्यास होणे गरजेचे असते. पण लोक सामाजिक माध्यमावर येणाऱ्या पोस्ट ला खरा इतिहास समजतात, तेव्हा असे गैरसमज निर्माण होतात.

पंडित जवाहरलाल नेहरु आणि वल्लभभाई पटेल आपल्या पाठीमागे इतिहासाच्या संशोधनासाठी, अभ्यासकासाठी विपुल साहित्य सोडून गेले आहे. यामध्ये फक्त सरदार पटेलाच्या पत्राचे दहा खंड १९४५-५०, त्यांचे समग्र साहित्य, त्याच बरोबर पंडित नेहरुचे बंच ऑफ वोल्ड लेटर्स, त्यांच्या समग्र साहित्याचे ६१ खंड उपलब्ध आहेत. त्यांच्या आधारे पटेल आणि नेहरुची चर्चा केल्यास प्रचलित विचारधारेपेक्षा वेगळे पटेल आणि नेहरु पाहण्यास मिळतात. एक समान ध्येय नसणाऱ्या व्यक्तीमध्ये कधीही वैयक्तिक मतभेद होत नाहीत. तेव्हा दोन व्यक्ती एका विशिष्ट ध्येयावर काम करतात तेव्हा ते विचाराने जवळ आलेले असतात. नेहरु आणि पटेल यांच्यामध्ये वैचारिक मतभेद होते असे म्हटले जाते ते चूक आहे असे नाही. पटेल नेहरुपेक्षा १४ वर्षांनी मोठे होते. पारंपरिक ग्रामीण शेतकऱ्याशी जुडलेला माणुस, तर पंडित नेहरु समाजवादी विचारधारेतून भारतीय समस्यांकडे बघणारा माणूस. त्यामुळे वैचारिक पातळीवर काही प्रमाणात मतभेद होणे साहजिक आहे, पण मतभेद फक्त नेहरु आणि पटेल यांच्यातच होते का? गांधी आणि पटेल, गांधी आणि सुभाष, गांधी आणि नेहरु यांच्यातही वैचारिक वाद होतेच. गांधी नेहरु विषयी असणाऱ्या मतभेदाविषयी म्हणाले होते की, ``ते तरुण आहेत त्यांना माझे काही विचार पसंत नाही, पण माझ्या नंतर ते माझीच भाषा बोलतील.''[१] यावरुन हे स्पष्ट होते की नेत्यामध्ये मतभेद होते पण त्या मतभेदाचे रुपांतर कधीही वैयक्तिक मतभेदामध्ये झाले नाही. पण आज

वैचारिक मतभेदाना वैयक्तिक मतभेदामध्ये रुपांतरीत करुन एकमेकांविषयी द्वेष पसरविण्याचे काम सुरु आहे.

पटेल आणि नेहरु हे १९२३ पासून एकमेकांच्या संपर्कात होते. दोघे गांधीजी चे अत्यंत विश्वास, दोघांचाही मोठा पत्र व्यवहार उपलब्ध आहे. पण त्यामध्ये कुठेही मतभेदाचे फार रौद्र रूप बघायला मिळत नाही. दोघांनी मिळून काँग्रेसच्या अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या. १९३७ च्या निवडणुकीचे संपूर्ण काम नेहरु आणि पटेलाकडे होते. पंडित नेहरुकडे प्रचार प्रमुखाची जबाबदारी होते. तर सरदार पटेल मुख्य संघटकाच्या भूमिकेत होते. तेव्हा दोघांमध्ये कोणतेही वाद झाल्याचे दिसत नाही. त्या निवडणुकीमध्ये काँग्रेसला प्रचंड यश मिळाले होते. तसेच १९४५-४६ च्या निवडणुकीमध्ये संघठनाची जबाबदारी, उमेदवाराच्या निवडीची जबाबदारी आणि निधी जमा करण्याचीही जबाबदारी पटेलांकडे होती. नेहरुकडे याही वेळी मुख्य प्रचारकाची जबाबदारी होते. पंडित नेहरुना काही प्रांतामध्ये उमेदवाराच्या निवडी संदर्भात गोंधळ जाणवला होता त्या संबंधी नेहरुनी पटेलाना कळविले होते. त्यास पटेलानी ३ नोव्हेंबर १९४५ रोजी नेहरुंना पत्र लिहिले. त्यात ते म्हणाले, ``निवडणुकी मध्ये उमेदवाराची निवड करणे अत्यंत कठिन आहे. माझ्याकडे विविध प्रांतामधून अर्ज, विनंत्या, तक्रारी, शिफारसी ची लाट आली आहे. कौन्सिलमध्ये जाण्याची वेडी स्पर्धा सुरु झाली आहे. हे पाहुन दुःख होते. यास आपण थांबवले पाहिजे.''[२] नेहरु उमेदवाराच्या निवड प्रक्रियेमध्ये कुठेही नव्हते पण तरीही त्यांना पटेल सहभागी करुन घेतात. इथे कुठेही एकमेकांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप केल्याचा आरोप अथवा आक्षेप कोणी घेतलेला नाही. आपण हे विसरतो की त्या नेत्यांनी प्रत्येक कामामध्ये एकमेकांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला होता.

पंडित नेहरु व गांधीजी वर हा आक्षेप घेतला जातो की त्यांनी पटेलाना पंतप्रधान पदापासुन आणि मंत्रीमंडळापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. पण हे सत्य नाही. १५ पैकी १२ समितीचा निर्णय डावलुन नेहरुना पंतप्रधान केले हे वास्तव आहे. पण गांधी असे का करतात? याचे मुख्य कारण म्हणजे काँग्रेस संघटनेमध्ये सर्वात प्रबळ व लोकप्रिय सरदार पटेल होते. तर

पंडित नेहरु हे जनतेचा लोकप्रिय चेहरा होते. देशापुढील समस्या पाहता, फाळणीचे संकट पाहता संघटनेपेक्षा लोकांवर नियंत्रण ठेवणारा नेत्याची जास्त आवश्यकता होती. म्हणून नेहरुची नियुक्ती केली, दुसरे कारण नेहरु आणि पटेल याच्यात १४ वर्षांचे अंतर होते. पटेलांच्या शारीरिक मर्यादा होत्या, गांधीना त्याची कल्पना होती. त्यामुळे त्यांनी पटेलाना बाजुला ठेवले होते. तिसरे कारण नेहरु आणि पटेल यांच्या व्यक्तीमत्वातील भेद. याविषयी गांधी म्हणाले होते.``पटेल हा भारतीय चेहरा आहे तर नेहरु जागतिक चेहरा आहे. नव्या राष्ट्राला जागतिक चेहरा असणाऱ्या व्यक्तीची गरज आहे.'' या कारणाकडे पहिल्यास नेहरु पंतप्रधान झाले यात काही नेहरुची ईर्ष्या होती असे काही दिसत नाही.

नेहरु व गांधीवर हा ही आरोप होतो की पटेलाना मंत्रीमंडळात सामील करण्याची इच्छा नव्हती पण ही गोष्ट सत्य नाही. १ ऑगस्ट १९४७ रोजी जवाहलाल नेहरुनी पटेलाना पत्र लिहिले. त्यात नेहरु म्हणाले, ``काही गोष्टीमध्ये औपचारिकता निभावने गरजेचे असते, म्हणून मी नव्या मंत्रीमंडळामध्ये सामील होण्यासाठी आपणास आमंत्रित करत आहे. या पत्राचे काही महत्व नाही कारण आपण या मंत्रीमंडळाचे सर्वात प्रमुख स्तंभ आहात.''[३] या पत्राला पटेलानी ३ ऑगस्ट १९४७ रोजी दिलेले उत्तर अत्यंत रोचक आहे. ``एका दुसऱ्या प्रति आपला जो अनुराग आणि प्रेम राहिले आहे, मागच्या ३० वर्षांपासून आपली जी अखंड मित्रता आहे, त्याकडे पाहिल्यास आपल्या दोघांमध्ये औपचारिकतेला कुठेही जागा नाही. मला आशा आहे की माझ्या सेवा उर्वरित जीवनासाठी पण तुमच्या अधीन राहतील. तुमच्या त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी माझी शुद्ध आणि संपूर्ण इमानदारी आणि निष्ठा प्राप्त होईल. त्यासाठी आपल्या सारखा त्याग आणि बलिदान भारतामध्ये अन्य कोणत्याही पुरुषाने केला नाही.''[४] पटेल आणि नेहरुच्या या पत्राकडे पाहिल्यास असे कुठेही जाणवत नाही की त्यांच्या सत्तेसाठी पंतप्रधान पदासाठी काही ईर्ष्या होती.

पंडित नेहरु आणि सरदार यांच्यात जम्मु कश्मीरच्या प्रश्नाबाबत मतभेद असल्याचे सांगितले जाते. तसेच नेहरुकडून पटेलाच्या मंत्रालयामध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप केला जातो. यावर दृष्टीक्षेप टाकल्यास जाणवते की आजच्या लोकांनी जम्मु कश्मीर समस्येकडे अत्यंत

नकारात्मक दृष्टीने पाहिले. पटेल गृहमंत्री होते आणि नेहरु पंतप्रधान. पंतप्रधानाला कोणत्याही विभागामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार असतो. कुठल्याही निर्णयामध्ये अंतिम निर्णय हा त्याचाच असतो. त्यामुळे पंतप्रधानांकडून दिल्या जाणाऱ्या सूचना हस्तक्षेप ठरत नाही. पण हा झाला एक भाग, या समस्येचा दुसरा भाग वी. पी. मेनन यांनी द स्टोरी ऑफ द इन्टिग्रेशन ऑफ द इंडियन स्टेटस या पुस्तकामध्ये कश्मीर वर एक स्वतंत्र प्रकरण दिले आहे. त्याचे पृष्ठ ३९३-३९४ अभ्यासकांनी वाचले पाहिजे. त्यात माऊंटबॅटन हरिसिंहाला म्हणाले ``तुम्ही जर पाकिस्तानमध्ये सामील झालात तरी यामुळे भारत किंचित ही नाराज होणार नाही. मला स्वतः सरदार पटेलानी विश्वास दिला आहे.''[५] याचा अर्थ पटेल स्वतः कश्मीर भारतामध्ये सामील करण्याच्या मन:स्थितीमध्ये नव्हते. वी. शंकर यांच्या मतानुसार पटेलानी माऊंटबॅटनना सांगितले होते की, ``कश्मीर पाकिस्तानमध्ये विलिन झाले तरी आमची काही हरकत नाही.''[६] पटेल ही भूमिका घेतात कारण कश्मीरची बहुसंख्य जनता मुस्लिम होती. फाळणीच्या अटीनुसार महत्वपूर्ण गोष्ट द्वि राष्ट्र सिद्धांत होता. पाकिस्तान मुस्लिमासाठी, हिंदुस्थान हिंदुसाठी. आता राहिला प्रश्न नेहरुचा तर पटेल स्वतः नेहरु म्हटले होते की, ``माझ्या पेक्षा कश्मीर तुम्ही चांगल्या पद्धतीने ओळखतात. तुम्ही पण लक्ष घाला. पण त्या दोघांनीही यात लक्ष दिले. एका नीतीच्या माध्यमातून हरिसिंहाची जबाबदारी पटेलाकडे तर माऊंटबॅटनची जबाबदारी नेहरुकडे होती. त्याच नीतीचा परिणाम म्हणुन आज कश्मीर भारतात आहे. जसा हा ही दावा केला जातो की कश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेत घेऊ जाण्यास पटेलाचा विरोध होता. पण यात कुठेही सत्य अंश नाही. ३ जानेवारी १९४८ रोजी पटेलानी कलकत्ता येथे भाषण करताना याविषयी आपले विचार मांडले ते म्हणाले, ``कश्मीर विषयी आमची भूमिका ही चोरी छूप्या पद्धतीने लढाईपेक्षा उघडरित्या समोर येऊन लढण्याची आहे. त्यामुळेच आम्ही युनोत गेलो.''[७]

वर उद्धृत केलेल्या ऐतिहासिक तथ्याच्या आधारे हे स्पष्ट होते की नेहरु आणि पटेल यांच्यात वैचरिक मतभेदापेक्षाही परस्पर सहकार्य होते. पण याचा अर्थ असा नाही की दोघामध्ये काहीच मतभेद नव्हते. पटेलांना नेहरुचे कश्मीरमध्ये जनमत संग्रहाचे धोरण पसंत नव्हते.

नेहरुना ही संस्थाने खालसा करण्याच्या पद्धतीवर काही शंका होत्या पण इतके असतानाही दोघे सोबत होते. पटेलाचे चरित्र राजमोहन गांधीनी लिहिले. त्याच्या ५३२ नंबरच्या पृष्ठावर वर्णन आहे, ``पटेल प्रकृतीच्या कारणाने दिल्लीची थंड हवा सोडून मुंबईला जात असताना पटेल एन. वी. गाडगीळना म्हणाले, आता मी जीवंत राहणार नाही तुम्ही मला वचन द्या, पंडितजी सोबत जे काही मतभेद असेल त्यांना एकटे सोडू नका.''[८] हा प्रसंग १२ डिसेंबर १९५० चा आहे. १५ डिसेंबर १९५० रोजी पटेलाचे निधन झाले. आयुष्याच्या शेवट पर्यंत एकमेकांविषयी अत्यंत मित्रत्वाच्या, स्नेहाच्या भावना ठेवून लोक गेले. त्यांचा मृत्यु त्यांना वेगळा करु शकला नाही, पण सत्ताधाऱ्याच्या प्रचाराने मात्र त्यांना वेगळे केले. त्यांना पुन्हा जनमाणसाच्या नजरेत एक करण्यासाठीचा हा एक छोटासा प्रयत्न.

## संदर्भ:

१). बिपिनचंद्र, भारत का स्वातंत्र्य संग्राम,दिल्ली,२००३.पृ १०५.

२). व्ही शंकर, सरदार पटेल चुना हुआ पत्र व्यवहार १९४५-१९५०, नवजीवन ट्रस्ट,२०११, पृ ३०.

३).उपरोक्त, पृ १८२.

४) उपरोक्त , पृ १८३.

५). व्ही. पी. मेनन, द स्टोरी ऑफ द इन्टिग्रेशन ऑफ द इंडियन स्टेटस, ओरीएंट ब्ल्याक स्वान,१९५६, पृ ३९३-३९४.

६).उपरोक्त

७).उपरोक्त

८).राजमोहन गांधी, पटेल.ए लाईफ,नवजीवन ट्रस्ट,२०११.पृ ५३२.